**रे.मु.नं.३००/२०२३**
**निशाण क्र.३७ ची पुरवणी**

**वादी तर्फे साक्षीदार क्र. २ चा उलटतपास प्रतिवादी तर्फे वकील श्री. डी.एम. सोनवणे यांचे तर्फे शपथेवर सुरू**

मी पोलिस दलामध्ये नोकरीस होतो. मी प्रतिवादी ओळखतो कारण तो माझा वर्ग मित्र होता. हे म्हणणे खरे नाही की, मी माळशिरस येथे नोकरीस असताना दोन वेळेस सस्पेण्ड झालेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी टेंभूर्णी व करमाळा येथे नोकरीस असताना सस्पेण्ड झालेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, रेल्वे भरती प्रकरणात माझे वरती पैसे घेतले बाबत गुन्हा रजि. क्र. ३०८/२०१६ चा गुन्हा करमाळा पोलिस स्टेशनला दाखल झालेला होता व त्याबाबत न्यायालयामध्ये आर.सी.सी. क्र. ०५/२०१८ भा.द.वि. कलम ४२० सह ३४ अन्वये दाखल झालेला होता. सदर गुन्हया मध्ये मी सहा महिन्या पर्यंत न्यायालयीन कोठडी मध्ये होतो. साक्षीदार स्वत: सांगतो की, सदर केसचा न्यायनिर्णय झालेला आहे.

उमरड भागातील जमिनी या उजनी जलाशयावरून बागायती झालेल्या आहे. सदर भागात उस व केळीची पिके घेतली जातात. सदर भागात शेती ही आधुनिक पध्दतीने केली जाते तसेच शेतीची मशागत करण्यासाठी टॅक्टरचा वापर केला जातो. दावा मिळकत सन २००५ साली प्रतिवादीने खरेदी केल्याबाबत मला माहिती नाही. सन २००५ सालापर्यंत दावा मिळकतीची वहिवाट वादी करत होते. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत खरेदी नंतर सन २००५ पासून प्रतिवादी हे मजुरांमार्फत सदरची मिळकत सन २०१६ पर्यंत वहिवाटीत होते. प्रतिवादी हे सेवानिवृत्त झालेचे माहित आहे परंतू ते सन २०१६ मध्ये सेवानिवृत्त झालेबाबत मला माहिती नाही. प्रतिवादी हे कोरोना कालावधी नंतर मौजे उमरड येथे राहण्यास आलेबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोरोना कालावधी नंतर प्रतिवादी दावा मिळकत वहिवाटीत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. १७० हा उमरड गावाचे दक्षिण बाजुस आहे. साक्षीदार स्वत: सांगतो की, पश्चिम बाजुस आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही पश्चिमेस आहे. दावा मिळकतीच्या चतु:सिमा सांगू शकत नाही. तसेच दावा मिळकतीच्या चारही बाजुस कोण शेती वहिवाटते ते मी सांगू शकत नाही.

हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती पासुन माझी जमिन दिड कि.मी. अंतरावर असून माझा जाण्या—येण्याचा मार्ग दावा मिळकती पासुन आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत वादी वहिवाटीत असून वादी यांनी पिक घेतलेले आहे हे मी खोटे सांगत आहे. सध्या दावा मिळकती मध्ये वादी यांनी उसाचे पिक घेतलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन २०११ पासुन वादीस जमिनीमध्ये लागणारा बैल बारदाणा आवश्यक असेल त्या वेळेस मी मदत केली आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन २०२३ मध्ये वादीने लावलेले पिका करिता मी मदत केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीने वादीस हरकत अडथळा केल्याचे मी पाहिलेले आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीवर प्रतिवादीचा कब्जा नव्हता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वादी हे माझे पाहुणे असल्याने व त्यांना सहकार्य करण्याकरिता पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल केले व आज रोजी खोटे साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण,
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत्त

(एम.पी.एखे)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर, करमाळा

दि.१३.०२.२०२४